मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिकेच्या शाळांचा दहावीचा 94.20 टक्के निकाल

## गुणवंत आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना आर्थिक प्रोत्साहन : 432 विद्यार्थी उत्तीर्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी (१३ मे) जाहीर झाला आहे. या परीक्षेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महानगरपालिकेतील एकूण २,५९७ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नाव नोंदवले होते. त्यामध्ये मराठी माध्यमातील २,१५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून, त्यापैकी १,९६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उर्दू माध्यमात एकूण ४४२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यातील ४३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.




महानगरपालिकेच्या शाळातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ९४.२० टक्के एवढे आहे. हे यश म्हणजे संपूर्ण महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे.

दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवलेल्या महापालिकेच्या शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक प्रोत्साहन देऊन करण्यात येणार आहे.

यामध्ये ८० ते ८४.९९ टक्के गुण प्राप्त केलेल्या ९५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५,००० हजार रुपये, ८५ ते ८९.९९ टक्के गुण प्राप्त ६२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०,००० हजार रुपये तर ९० ते १०० टक्के गुण मिळवणाऱ्या १८ विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ लाख रुपये देण्यात येणार आहेत. तसेच परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या ७ दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष गौरव म्हणून प्रत्येकी ५०,००० रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

### 90 टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणारे विद्यार्थी

» स्वप्नाली झिंजे, गायत्री विजणमवार, सुरवसे संघर्ष, देवेंद्र झोपळ, पाईकराव चंदू, मंदल मानस, चतुर्वेदी कमलेश, कांबळे शुभम, शिंदे शिवकन्या, कांबळे यशराज, शेख बुशरा आरुफ, काजले अमृता, चौरशिया ललन, मुदमवाढ अष्टविनायक, कांबळे प्रतिक्षा, महतो राजेंद्र, पुलावळे सिद्धी आणि अन्सारी रीयासत.

“ दहावीच्या परीक्षेत महापालिकेच्या शाळांनी यंदा भरीव कामगिरी केली आहे. हा निकाल आमच्या महापालिकेतील शिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांचे प्रतीक आहे. उर्दू माध्यमातून ९७.७४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण होणे, ही आनंदाची बाब आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

---

# राष्ट्रीय महामार्ग 48 लगतचे सेवा रस्ते होणार विकसित

## रस्त्याच्या कामाला गती देण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतून जाणारा मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे या महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांचा विकास करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्व प्रशासकीय यंत्रणांना समन्वयाने आणि गतीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

महानगरपालिका आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांची एक संयुक्त आढावा बैठक आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत राष्ट्रीय महामार्ग ४८ लगतच्या सेवा रस्त्यांच्या विकासावर चर्चा करण्यात आली.

बैठकीला भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त मनोज लोणकर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित आदी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांनी रस्त्याच्या कामात येणारे सर्व होर्डिंग्ज, अनधिकृत टपऱ्या आणि बांधकामे तातडीने हटवण्याचे



आदेश दिले आहेत. तसेच, रस्त्याच्या कामात अडथळा ठरणाऱ्या भूमिगत सेवा वाहिन्या टाकताना भविष्याचा विचार करून नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मलवाहिन्या, जलवाहिन्या, विद्युतवाहिन्या, जल:निसारण वाहिन्या आदी सर्व सेवांचा विचार करून रस्त्याचे विकसन करावे, असेही ते म्हणाले. सेवा रस्त्यांचे विकसन करताना विविध विभागांशी समन्वय साधून काम करावे आणि विहित वेळेत काम पूर्ण करावे, असेही त्यांनी सांगितले. यासाठी महापालिकेच्या संबंधित विभागांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला आवश्यक ते सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

**सेवा रस्त्यांमुळे वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होईल**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ च्या बाजूला असलेले सेवा रस्ते विकसित झाल्यानंतर या रस्त्यावरची वाहतूक कोंडी कमी होईल. तसेच, हे सेवा रस्ते मुख्य महामार्गावरील गर्दी कमी करण्यास आणि एकूणच वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत करतील.

### सेवा रस्त्यांच्या विकासाचा आराखडा

» शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ च्या बाजूचा सध्याचा रस्ता १२ मीटर रुंद आहे. आता या रस्त्याचा १२ मीटरने विस्तार करून तो एकूण २४ मीटर रुंद केला जाणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या प्रकल्पाचा अंतिम आराखडा तयार केला असून, तेच या रस्त्याचे विकसन करणार आहेत. या बैठकीत रस्त्याच्या कामाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# पुण्यात आता ‘वृक्ष रुग्णवाहिका’

## जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येत्या 5 जूनपासून याची सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध रस्त्यांच्या कडेला असलेल्या झाडांच्या वाढीतील अडचणी दूर करण्याबरोबरच झाडांवर ठोकण्यात आलेले खिळे काढून टाकण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने ‘वृक्ष रुग्णवाहिका’ (ट्री ॲब्युलन्स) हा उपक्रम सुरू केला जाणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येत्या ५ जूनपासून याची सुरुवात केली जाणार आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी ही माहिती दिली.




पुणे शहरातील अनेक भागांत जुनी झाडे आहेत. विकासकामे करताना काही वृक्ष अडथळा ठरत असल्याचे ते काढून त्यांचे पुनर्रोपण महापालिकेच्या वतीने केले जाते. शहरात अस्तित्वात असलेल्या झाडांची वेगवेगळ्या कारणांमुळे पडझड होते, तर अनेक झाडांवर बेकायदा जाहिराती करण्यासाठी झाडांवर खिळे ठोकले जातात. या प्रकारामुळे या झाडाचे आयुष्य कमी होते. खिळे ठोकल्याने ही झाडे अधिक काळ टिकत नाहीत. त्यामुळे महापालिकेने ‘वृक्ष रुग्णवाहिका’ हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील सर्व झाडांची पाहणी केली जाणार आहे. ज्या झाडांना खिळे ठोकलेले आहेत. ते काढून टाकले जाणार आहेत. झाडांच्या वाढीसाठी अडथळा ठरणारे फलक, तसेच इतर बाबी हटविल्या जाणार आहेत. या विशेष वृक्ष रुग्णवाहिकेमध्ये झाडांची काळजी घेणारी सर्व यंत्रणा उपलब्ध असणार आहे. उद्यान विभागासोबत हा उपक्रम शहरात राबविला जाणार असून, या माध्यमातून शहरातील विविध झाडांची काळजी घेतली जाणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी स्पष्ट केले.

> शहरातील झाडांना खिळे ठोकण्यात आल्याने त्यांचे आयुष्य कमी होऊन ती सुकण्याचे प्रमाण अधिक आहे. झाडांच्या वाढीसाठीचे अडथळे दूर करण्यासाठी हा उपक्रम सुरू केला जाणार आहे. सामाजिक संस्थांनी (एनजीओ) यात भाग घ्यावा.
>
> **- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

# पीएमपीच्या ताफ्यात येणार एक हजार बस

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच पीएमआरडीएकडून 1,000 बसची खरेदी

**पुणे | प्रतिनिधी**

नागरिकांना एका भागातून दुसऱ्या भागात जा-ये करणे सोयीचे व्हावे, तसेच मेट्रो स्टेशनपासून इच्छितस्थळी जाण्यासाठी बससेवा उपलब्ध व्हावी, यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात एक हजार बस दाखल होणार आहेत.



पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांच्या माध्यमातून ५००, तर पीएमआरडीएकडून ५०० बसची खरेदी केली जाणार आहे. मंगळवारी झालेल्या पीएमपीएमएलच्या संचालक मंडळाच्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली. पुणे महापालिकेचे आयुक्त आणि पीएमपीचे संचालक डॉ. राजेंद्र भोसले यांनी पत्रकारांना ही माहिती दिली.

पुणे महापालिका ३०० बस, पिंपरी-चिंचवड महापालिका २०० बस, तर पीएमआरडीए ५०० बसची खरेदी करून त्या पीएमपीला देणार आहे. या बस १२ मीटर लांबीच्या असून, सीएनजीवरील आहेत. एका बससाठी ४८ लाख रुपये मोजावे लागणार आहेत. संचालक मंडळाच्या बैठकीत बस खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. काही महिन्यांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीएमपीसाठी दोन्ही महापालिका आणि पीएमआरडीएने एक हजार बसची खरेदी करावी, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार हा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला होता.

शहरातील प्रवाशांना कमी दरात बससेवा उपलब्ध करून देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. तसेच, शहरात उभारण्यात आलेल्या मेट्रो प्रकल्पाचा वापर करून मेट्रो स्थानकापासून घरापर्यंत जाण्यासाठी फिडर सेवा देता यावी, यासाठी बसची आवश्यकता आहे. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांच्या हितासाठी पाचशे बसची खरेदी महापालिकेकडून केली जाणार आहे. यासाठी पुणे महापालिका ६० टक्के, तर पिंपरी-चिंचवड महापालिका ४० टक्के आर्थिक भार उचलणार आहे. नागरिकांना सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुरविणे ही महापालिकेची जबाबदारी असल्याने दोन्ही महापालिका बस खरेदीचा खर्च उचलणार असल्याचे आयुक्त डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले.

या बसखरेदीसाठी महापालिकेकडून २३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पीएमपीकडून पीएमआरडीएच्या हद्दीतील १२२ मार्गांवर बससेवा पुरविली जाते. त्यामुळे ५०० बसची खरेदी पीएमआरडीएकडून केली जाणार आहे. या बस खरेदीची लवकरच सर्व प्रशासकीय बाबी पूर्ण करून निविदा काढली जाणार आहे.

# एचएसआरपीच्या नावाखाली वाहनचालकांची लूट!

## पिंपरी चिंचवड परिसरात काही अधिकृत व अनधिकृत गॅरेज, दुकानदार आणि ॲक्सेसरीज विक्रेते वाहनचालकांची आर्थिक लूट करत असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने देशभरात वाहनांसाठी एचएसआरपी (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट) सक्तीने लागू केली आहे. मात्र या आदेशाच्या अंमलबजावणीच्या नावाखाली पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात काही अधिकृत व अनधिकृत गॅरेज, दुकानदार आणि ॲक्सेसरीज विक्रेते वाहनचालकांची आर्थिक लूट करत असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

जुनी नंबर प्लेट काढून नवी एचएसआरपी बसवताना काही ठिकाणी वाहनधारकांकडून अवैधरित्या अतिरिक्त शुल्क आकारले जात आहे. अनेकांना जबरदस्तीने "हे नियम आहेत" असे सांगत जुनी नंबर प्लेट परत दिली जात नाही. काही ठिकाणी या प्लेट्स विक्रेत्यांकडेच जमा करून स्क्रॅपमध्ये टाकल्या जात असल्याचेही निदर्शनास आले आहे.

वाहनधारकांनी एचएसआरपी बसवताना अधिकृत पोर्टलवरूनच प्रक्रिया करावी, अनधिकृत ठिकाणी बदल करू नये, आणि जुन्या नंबर प्लेट परत मागण्यासाठी रीतसर मागणी करावी. अन्यथा ही लूट थांबणार नसल्याचा इशारा वाहतूक तज्ज्ञांकडून दिला जात आहे. एचएसआरपी लावताना ऑनलाइन शुल्क भरण्याची सुविधा अधिकृत पोर्टलवरच मर्यादित ठेवावी, आणि नंबर प्लेट बदलताना जुन्या प्लेटसाठी रीतसर पावती किंवा स्क्रॅपचे प्रमाणपत्र देण्यात यावे. अन्यथा सर्व प्रक्रियेला संशयास्पद स्वरूप येत असून त्याचा गैरफायदा लुटमार करणारे विक्रेते घेत आहेत. सरकारने एचएसआरपी लावणे सक्तीचे केले असले तरी जुन्या नंबर प्लेटसाठी कोणताही स्क्रॅप दर किंवा परत न देण्याचा नियम अधिकृतपणे नाही. तरीही गॅरेजमधून वाहनधारकांना जुन्या प्लेटबाबत कोणतीही पावती न देता त्या परत देण्यास टाळाटाळ केली जाते. यावर अधिकाऱ्यांनी कारवाई करावी,

काकडे पार्क, चिंचवड येथील एका अधिकृत सेंटरवर एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यासाठी वाहन चालक गेले असता प्रत्येकाकडून जुनी नंबर प्लेट काढण्यासाठी ५० रुपयांची मागणी करण्यात आली. याबाबत विचारणा केली असता त्याने पावतीवरील 'जुन्या नंबर प्लेट काढण्यासाठी अधिकृत फिटमेंट सेंटर जबाबदार राहणार नाही', या नियमावर बोट ठेवत ५० रुपयांची मागणी केली. पैसे द्यायचे नसल्यास स्वतः नंबर प्लेट काढून आणा, असे तेथील कर्मचाऱ्याने सांगितले.



### नागरिकांची मागणी – 'एचएसआरपी' लागू करताना पारदर्शकतेचा आग्रह

» या पार्श्वभूमीवर वाहनधारकांकडून मागणी करण्यात येत आहे की, एचएसआरपी लावताना ऑनलाइन शुल्क भरण्याची सुविधा अधिकृत पोर्टलवरच मर्यादित ठेवावी, आणि नंबर प्लेट बदलताना जुन्या प्लेटसाठी रीतसर पावती किंवा स्क्रॅपचे प्रमाणपत्र देण्यात यावे. अन्यथा सर्व प्रक्रियेला संशयास्पद स्वरूप येत असून त्याचा गैरफायदा लुटमार करणारे विक्रेते घेत आहेत.

### नियमांची चुकीची अंमलबजावणी

» वाहनचालकांचे म्हणणे आहे की, सरकारने एचएसआरपी लावणे सक्तीचे केले असले तरी जुन्या नंबर प्लेटसाठी कोणताही स्क्रॅप दर किंवा परत न देण्याचा नियम अधिकृतपणे नाही. तरीही गॅरेजमधून वाहनधारकांना जुन्या प्लेटबाबत कोणतीही पावती न देता त्या परत देण्यास टाळाटाळ केली जाते. यावर अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, अशी वाहन चालकांनी मागणी आहे. वाहन मालकांकडून काही ठिकाणी ५० ते ३०० रुपयांपर्यंत अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्याचे उघड झाले आहे.

### वाहन मालकांना आवाहन

» वाहनधारकांनी एचएसआरपी बसवताना अधिकृत पोर्टलवरूनच प्रक्रिया करावी, अनधिकृत ठिकाणी बदल करू नये, आणि जुन्या नंबर प्लेट परत मागण्यासाठी रीतसर मागणी करावी. अन्यथा ही लूट थांबणार नसल्याचा इशारा वाहतूक तज्ज्ञांकडून दिला जात आहे. प्रशासनाने लक्ष घालावे आणि लुटमारीला आळा घालावा, अशी नागरिकांची एकमुखी मागणी आहे.

> जुनी नंबर प्लेट काढण्यासाठी फिटमेंट सेंटर चालकाकडून पैशाची मागणी करणे गैर आहे. याबाबत नागरिक DYRTO-14-MH!GOV.IN यावर तक्रार करू शकतात. तक्रार आल्यावर संबंधितावर कायदेशीर कारवाई केली जाईल.
>
> **- संदेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड**

# निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांकडून 34 लाख 72 हजार दंड वसुल

## दक्ष ॲपच्या प्रभावी अंमलबजावणीचा पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका प्रशासनाकडून ॲपद्वारे दक्ष ॲपद्वारे ठेकेदारांना प्रमुख कार्यक्षमतेच्या निर्देशांकांवर (केपीआय) आधारित कामे दिली जातात. तर निकृष्ट कामगिरी करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई देखील करण्यात येत आहे. या ॲपची प्रभावीपणे अंमलबजावणि करत उद्यान विभागाच्या वतीने आतापर्यंत सुमारे 34 लाख 72 हजार 500 रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. सध्या 37 ठेकेदार शहरातील उद्यानांच्या देखभालीचे कामकाज पाहत आहेत.

सार्वजनिक उद्यानांची देखभाल सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेने दक्ष या नाविन्यपूर्ण ॲपची अंमलबजावणी केली आहे. हे वेब व मोबाईल आधारित प्लॅटफॉर्म अधिकाऱ्यांना रोजच्या उद्यान देखभाल कामांची नियुक्ती, देखरेख व पडताळणी करण्यासाठी सक्षम बनवत आहे. या डिजिटल परिवर्तनामुळे सर्व प्रभागांतील उद्यान व्यवस्थापनात पारदर्शकता व कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. या दक्ष ॲपद्वारे ठेकेदारांना प्रमुख कार्यक्षमतेच्या निर्देशांकांवर (केपीआय) आधारित कामे दिली जातात. ही कामे पूर्ण करताना ठेकेदारांनी काम सुरू होण्यापुर्वीची आणि काम पूर्ण झाल्यानंतरची छायाचित्रे जिओ टॅगिंगसह पवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

तसेच याच ॲपच्या माध्यमातून पर्यवेक्षक प्रत्यक्षस्थळी जाऊन कामाची पडताळणी करत असून यामुळे अहवालांची अचूकता सुनिश्चित होऊन जुन्या कालबाह्य, कागदोपत्री प्रगती अहवालांवरचे अवलंबित्व कमी झाले आहे. या ॲपद्वारे कामांची प्रत्यक्ष तपासणी उपआयुक्त, उद्यान अधीक्षक यांच्यासह संबंधित वरिष्ठ निरीक्षक अधिकारी करत आहेत. त्याचबरोबर, महानगरपालिका आयुक्त व अतिरिक्त आयुक्त देखील या सर्व कामकाजाचे थेट व रिअल टाइम निरीक्षण करू शकतात. या पच्या माध्यमातून नागरी सुविधांच्या देखभालीसाठी एक आधुनिक व परिणामकारक यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. तसेच, फिल्ड अधिकाऱ्यांची उपस्थिती देखील दक्ष पद्वारे थेट नोंदवली जाते. तसेच ठराविक कामे न करणाऱ्या ठेकेदारांना दंडाची सूचना थेट त्यांच्या मोबाईलवर मेसेजद्वारे पाठविण्याची स्वयंचलित सुविधा देखील पमध्ये देण्यात आली आहे.




> दक्ष ॲपच्या अंमलबजावणीमुळे पिंपरी चिंचवड महापालिका उद्यान व्यवस्थापनामध्ये एक सकारात्मक बदल घडवत आहे. प्रत्येक उद्यानाच्या देखभालीसंबंधी कामांची नियोजनबद्ध नोंद, त्याची तांत्रिक पडताळणी आणि तात्काळ कारवाई याची खात्री करणे सोपे झाले आहे. प्रत्येक नागरिकाला स्वच्छ, सुशोभित आणि सुरक्षित सार्वजनिक जागा उपलब्ध करून देणे हा यामागचा उद्देश असून दक्ष ॲप हे त्याकडे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड**


# इंदिरा तलाव उपेक्षितच, गावे तहानलेली

**सध्या या गावांना मुबलक पाणीपुरवठा होत आहे; परंतु पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने आगामी काही दिवसात पाणी टंचाई निर्माण होणार आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

सांडभोरवाडी (तिन्हेवाडी) हद्दीत असलेल्या इंदिरा पाझर तलावाची पाणी पातळी झपाट्याने घटली आहे. धरणाच्या तळाला मोठ्या प्रमाणात गाळ असल्याने वरवर पाणीसाठा दिसत असला तरी काही दिवसांत हे पाणी संपुष्टात येण्याची भीती असून पाच गावांच्या पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम होणार आहे.

इंदिरा पाझर तलावातील पाणीसाठा कमी झाल्याने सांडभोरवाडी (तिन्हेवाडी) सह जैदवाडी, वरची भांबुरवाडी, तुकाईवाडी (ता. खेड) आणि पेठ (ता. आंबेगाव) अशा पाच गावांच्या पाणी योजना विस्कळीत होणार आहे. सध्या या पाचही गावांना मुबलक पाणीपुरवठा होत आहे; परंतु पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने आगामी काही दिवसात पाणी टंचाई निर्माण होणार आहे.



तलावात 50 वर्षांपासून गाळ साठत आला आहे. त्यामुळे पाणी साठ्यात मर्यादा येत आहेत. नाम फाउंडेशनकडून धरणातील गाळ काढण्यासाठी मोठे अर्थसहाय्य आणि यंत्रणा देखील उपलब्ध करून दिली जाते; मात्र शासकीय प्रस्ताव आणि मंजुरी यामध्ये उन्हाळा निघुन जातो. खेड तालुक्यातील अनेक गावातील पाणी योजनांच्या पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींनी तळ गाठले आहेत. तालुक्यातील काही गावातील पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. पूर्व भागातील गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे.

पुणे-नाशिक महामार्गाच्या जुन्या खेड घाटा लगत इंदिरा पाझर तलाव आहे. 1971 मध्ये झालेल्या या पाझर तलावाचा परिसरातील शेती, पिण्याच्या पाण्याच्या योजनासाठी उपयोग होत आला आहे. आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार आणि खेड तालुक्यातील सौरंग्या डोंगर रांगामधून ओढ्याने येणाऱ्या पावसाळ्यातील पुराच्या पाण्यावर या तलावाचा पाणीसाठा अवलंबुन आहे. तर दरवर्षी साठणाऱ्या पाण्यावर खेड आणि आंबेगाव तालुक्यातील पाच गावांच्या पाणीपुरवठा योजना तसेच शेतीसाठी हे पाणी वरदान ठरले आहे.

### पूर्व भागातील गावांना टँकरने पाणीपुरवठा

» खेड तालुक्यातील अनेक गावातील पाणी योजनांच्या पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींनी तळ गाठले आहेत. तालुक्यातील काही गावातील पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. पूर्व भागातील गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. यावर्षी मान्सून लवकर असल्याचे सांगितले जाते मात्र तो लवकर दाखल झाला नाही तर जून महिन्यात पाणीटंचाईचे भीषण संकटाला सर्वांना तोंड द्यावे लागणार आहे.

### 50 वर्षांपासून गाळच काढलेला नाही

» पाझर तलावाच्या माती बांधाची उंची कमी असल्याने मोजकेच पाणी साठते. त्यातही तलावात 50 वर्षांपासून गाळ साठत आला आहे. त्यामुळे पाणी साठ्यात मर्यादा येत आहेत. नाम फाउंडेशनकडून धरणातील गाळ काढण्यासाठी मोठे अर्थसहाय्य आणि यंत्रणा देखील उपलब्ध करून दिली जाते; मात्र शासकीय प्रस्ताव आणि मंजुरी यामध्ये उन्हाळा निघुन जातो.असे दरवर्षी होत असल्याने तलावातील गाळ काढण्यात अडचणी येत असल्याबाबत वरची भांबुरवाडीचे सरपंच विजय थिगळे, जैदवाडीच्या सरपंच शीतल जैद यांनी सांगितले..

### तिनही धरणांनी गाठला तळ

» तालुक्यातील भामा आसखेड, चास कमान धरण आणि कळमोडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला आहे. भामा आसखेड धरणात 16 टक्के, चास कमान धरणात 9.49 टक्के तर कळमोडी धरणात 23 टक्के पाणी साठा शिल्लक आहे. त्यामुळे जून महिन्याच्या सुरवातीला पाऊस झाला नाही तर पाणी संकट वाढणार आहे.

“ इंदिरा तलावाच्या पाणी साठा अत्यल्प आहे. चासकमान धरणाच्या राजगुरूनगर नगरजवळून वाहणाऱ्या डाव्या कालव्यातून धरणात सिंचन प्रकल्प राबवावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच तलावाची पुर्वीची खोली कायम करण्यासाठी गाळ काढण्याचे नियोजन केले आहे. काही प्रमाणात गाळ काढण्यात येत आहे.

**- प्रतीक्षा पाचारणे, सरपंच, सांडभोरवाडी तथा महिला अध्यक्ष, खेड तालुका सरपंच परिषद**

---

# आळंदीतील पदपथ विक्रेत्यांसाठी? अतिक्रमणामुळे नागरिक हैराण : प्रशासनाची निष्क्रियता

**संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याला अवघा महिना बाकी असताना आळंदीतील पदपथांवरील अतिक्रमणाची समस्या गंभीर बनली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याला अवघा महिना बाकी असताना आळंदीतील पदपथांवरील अतिक्रमणाची समस्या गंभीर बनली आहे. मुख्य रस्त्यांवरील पदपथांवर खाद्यपदार्थांच्या गाड्या, कपड्यांचे स्टॉल, फळविक्रेते, पंक्चर दुकाने यांसारख्या टपऱ्यांनी अतिक्रमण केले आहे.



यामुळे पादचाऱ्यांना, विशेषतः वृद्ध आणि भाविकांना, मुख्य रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई होत असली, तरी ती तात्पुरती ठरत असून पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त करीत पदपथ पादचाऱ्यांसाठी की विक्रेत्यांसाठी, असा सवाल उपस्थित केला आहे.\

प्रदक्षिण रोडसह वडगाव रोडवरील पदपथांवर अतिक्रमणाचा प्रश्न अधिकच बिकट आहे. खाद्यपदार्थांच्या गाड्या, फळविक्रेते आणि पंक्चर दुकानांनी पदपथ व्यापला आहे. यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत असून, अपघाताचा धोका वाढला आहे. मरकळ रोड येथील टाकी शेजारील पदपथावरही विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. नदी पलीकडील दर्शनबारी व्यवस्थेजवळील पदपथावर लाकडी बांबू आणि इतर साहित्याने अडथळे निर्माण झाले आहेत. यामुळे भाविक आणि स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### उपाय काय?

- » पदपथवरील विक्रेत्यांसाठी नियोजित जागा आणि परवाने देणे
- » प्रशासनाने सातत्यपूर्ण अतिक्रमणविरोधी कारवाई करावी
- » पदपथावरील विक्रेत्यांसाठी नियोजित जागा आणि परवाने द्यावेत
- » विक्रेत्यांनी स्वयंशिस्त पाळून पदपथ मोकळा ठेवावा

“ महाराष्ट्र शासनाने तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत आळंदीतील सर्व रस्ते, व पदपथ विकसित केले आहेत मात्र विविध प्रकारच्या व्यवसायकांनी हे पदपथ गिळंकृत केले आहेत, त्यामुळे स्थानिकांसह भाविकांना रस्ता ओलांडणे देखील जिकरीचे झाले आहे. पालखी सोहळा अवघ्या एक महिन्यावर येऊन ठेपला आहे, तरी वारी पूर्वीच आळंदीमध्ये असणाऱ्या सर्व पदपथांवरील अतिक्रमणे काढून घेतली जाणार आहे.

**-माधव खांडेकर, मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद**